MAHBIL03429/13/1/2000-TC खाजगी वितरणासाठी वर्ष: अकरावे । अंक नववा । जानेवारी, २०१२

# CIDCO Nirmiti

A NEWSLETTER

‘निर्मिती’ www.cidcoindia.com या संकेतस्थळावरही उपलब्ध



03 २०११ : सिडकोच्या दृढसंकल्पांच्या पूर्ततेचे वर्ष


05 सिडको भवन येथील नूतनीकृत समिती कक्षाचे उद्घाटन


06 सिडकोच्या दिनदर्शिका-दैनंदिनीचे प्रकाशन


07 Delegates from GUDA & GIFT visited CIDCO and Navi Mumbai.




# नववर्षाच्या शुभेच्छा

सन २०११ या वर्षात सिडकोच्या कारकिर्दीचा आलेख उंचावला. या वर्षाने नवी मुंबईच्या विकासप्रवासात सातत्याने महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या रूपात चैतन्य बहाल केले. यामुळे सन २०१२ या वर्षात अनेक सार्वजनिक प्रकल्पांच्या विकासाची रूपरेषा स्पष्ट झाली. मागील ३ वर्षांच्या काळात व विशेषत्वाने २०११ मध्ये सिडकोने केलेल्या संकल्पांना साकारणारे वर्ष २०१२ ठरेल असा विश्वास आहे.

२०११ हे वर्ष सिडकोसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. नवी मुंबई मेट्रोच्या विकासकामास सुरुवात व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पूर्वतयारीची कार्यवाही याच वर्षात गतिमान झाली. आगरी-कोळी संस्कृती भवन, सीवूड्स-दारावे उड्डाणपुलाचे लोकार्पण होऊन सिडको प्रदर्शन संकुल, आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्स, सेंट्रल पार्क यांनी पूर्णत्वाकडे जाण्यासाठी या वर्षात झेप घेतली. तर उलवे येथील 'उन्नती', या योजनेची संगणकीय सोडत संपन्न होऊन सर्वसामान्यांसाठी १२,००० सदनिकांचा महाप्रकल्प याच वर्षाने जनतेसाठी प्रस्तावित केला. या प्रकल्पांसोबत खारघर पादचारी पुल, ग्रामविकास भवन, भूमिपुत्र भवन उलवे, त्याचप्रमाणे नागरी आरोग्य केंद्र असे प्रकल्प २०११ याच वर्षाने २०१२ ला दिले.

या समग्र पार्श्वभूमीवर २०१२ हे वर्ष देखील सिडकोला नगरनियोजन व सोयी-सुविधांच्या विकासक्षेत्रात मानाची पाने बहाल करील.

२०१२ या वर्षात येणाऱ्या प्रकल्पांमुळे सिडकोच्या लौकिकाला अधिक तेजस्विता लाभणार यात शंका नाही.



नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



**प्रमोद हिंदुराव**
अध्यक्ष

**तानाजी सत्रे**
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक

# २०११ : सिडकोच्या दृढसंकल्पांच्या पूर्ततेचे वर्ष








सिडकोच्या मागील ४१ वर्षांच्या काळात झालेल्या प्रवासाला २०११ या वर्षाने अधिक झळाळी दिली. हे वर्ष सिडकोसाठी अत्यंत गौरवशाली उपक्रमांच्या पूर्ततेचे, तर काही तेजस्वी उपक्रमांची नवी समीकरणे मांडणारे ठरले. या वर्षात सिडकोने काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची पायाभरणी केली आहे, त्याचमुळे उगवत्या २०१२ या वर्षातील सिडकोच्या नगर नियोजन व पायाभूत सेवा-सुविधांच्या विकासाच्या ध्यासाला अधिक उंची देऊन उपक्रमशीलतेला जगासमोर अधिक प्रकाशमान करेल. सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. प्रमोद हिंदुराव** आणि व्यवस्थापकीय संचालक **श्री. तानाजी सत्रे** यांच्या नेतृत्वाखाली महामंडळाच्या विभाग प्रमुखांनी सर्व प्रकल्पांना आकार देण्यात सर्वतोपरी परिश्रम घेतल्याचे या वार्षिक अवलोकनावरून स्पष्ट होते.

२०११ मधील वर्षाच्या घडामोडींवर नजर टाकल्यास सिडकोने नगर विकासाच्या प्रत्येक टप्प्यात संतुलित कामगिरी केल्याचे जाणवते. नवी मुंबईतील दळणवळणाच्या माध्यमाला परिपूर्णत्त्व देणाऱ्या अतिमहत्त्वाकांक्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या मान्यता प्रक्रिया पूर्ण होऊन, प्रकल्प प्रत्यक्ष विकासाकडे मार्गक्रमण करीत आहे. अंतर्गत परिवहनाला सक्षमता देणाऱ्या नवी मुंबई मेट्रोच्या प्रत्यक्ष विकासाला सुरुवात होऊन, त्याच्या कालानुक्रमिक विकासाचे टप्पे दृष्टिपथात आले आहेत व नियोजित काळात हा प्रकल्प साकारला जाणार असल्याचे संकेत २०११ या वर्षातील घडामोडी पाहिल्यास दिसून येते. सीवूड्स-दारावे उड्डाणपुलाने सिडकोच्या रस्ते वाहतुकीच्या क्षेत्रातील सजग दृष्टिकोनाला पुन्हा एकदा सिद्ध केले. त्याचप्रमाणे उपनगरीय रेल्वे मार्गातील नेरुळ-सीवूड्स-उरण-मार्गाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. गृहनिर्माणाच्या क्षेत्रात उलवे येथील उन्नती गृहनिर्माण प्रकल्पाची सोडत आणि १२,००० घरांच्या नवीन योजनेची पूर्वतयारी याच वर्षी सुरू झाली. प्रकल्पग्रस्त पुनर्वसनाच्या प्रक्रियेला सांस्कृतिक पुनर्वसनाचीही जोड देऊन, नेरुळ येथे आगरी-कोळी संस्कृती भवनाची निर्मिती करण्यात आली. त्याचप्रमाणे द्रोणागिरी येथील प्रशिक्षण केंद्राचा आवाका खांदेश्वर येथे आणखी एका प्रशिक्षण केंद्राची स्थापना करून वाढविण्यात आला. तसेच १२.५% योजनेचे भूखंड वाटप बायोमॅट्रिक पद्धतीने करून या योजनेला अधिक पारदर्शकता प्रदान केली, त्याचप्रमाणे भूखंड वाटप संचिकांची माहिती सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून प्रकल्पग्रस्तांना अधिक सोयिस्करता बहाल केली. याच वर्षात आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्स, सिडको प्रदर्शन संकुल, सेंट्रल पार्क खारघर या प्रकल्पांनी वेग घेतला.

मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमीपूजन, आगरी-कोळी संस्कृती भवनाचे लोकार्पण आणि सीवूड्स दारावे उड्डाण पुलाचे उद्घाटन होऊन हे तीन प्रकल्प या वर्षात सिडकोने जनतेसाठी खुले केले, तर याच वर्षाने २०१२ सालात अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या लोकार्पणाची पायाभरणी केली आहे.

आता २०१२ या वर्षातील सिडकोने निर्धारित केलेल्या विकासकामांतील टप्पे जे नवी मुंबईच्या विकासाला नवे आयाम मिळवून देणार आहेत, त्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या संदर्भात राज्य शासन, केंद्र शासन, पर्यावरण व संरक्षण विभागाच्या मान्यतांची प्रक्रिया २०१०च्या अखेरपर्यंत पूर्ण झाली होती. या अतिभव्य प्रकल्पाच्या पूर्वतयारीचे मार्ग या वर्षाने मोकळे केले. कांदळवनासंदर्भातील परवानगी, नवी मुंबई विकास आराखड्यात सुधारणा, मेसर्स ली असोसिएट्स यांच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला आसपासच्या क्षेत्रांशी जोडणाऱ्या दृतगती परिवहन सुविधांचा विकास व सुधारणा संबंधीच्या अहवालाची प्राप्ती होऊन, त्या अनुषंगाने संबंधित संस्थांशी संपर्क साधून अपेक्षित कार्यवाहीच्या कृती आराखड्याच्या निश्चितीसाठी समन्वय साधणाऱ्या प्रक्रियांची सुरूवात झाली आहे. पुढील वर्षात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रत्यक्ष विकासाच्या अनुषंगाने मार्गक्रमण सुरू आहे. १ मे रोजी नवी मुंबई मेट्रोच्या बेलापूर-पेंधर या मार्गिकेच्या भूमिपूजनाने या प्रकल्पाच्या विकासाला सुरुवात झाली. मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम व्हायाडक्ट, स्टेशन्स, डेपो आणि सिस्टीम अशा ४ विभागांत विभागले असून पहिल्या टप्प्यातील व्हायाडक्टचे काम सुरू झाले आहे. मेट्रोच्या प्रतितास गती हाताळणीसाठी वळणाच्या त्रिज्येची सुधारणा करण्यात आली. कारशेड, डब्यांची स्वच्छता, दुरुस्ती या कामांसाठी तळोजा येथे २६ हेक्टर जागेवर डेपोचा विकास करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अन्य संबंधित कार्यवाही देखील सुरू आहेत.

२०११ या वर्षातील एकूण घडामोडींच्या पार्श्वभूमीवर २०१२च्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे पायाभरण झाले. २०१२ या वर्षात हे प्रकल्प जनतेला सादर होतील. त्यात आर्थिक दृष्ट्या दुर्बल, अल्प उत्पन्न गटांसाठी १२,०००

घरांची महायोजना नवीन वर्षात जाहीर होईल. तळोजा-पाचनंद येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटांकरिता ७,५६६ सदनिका तर, मध्यम उत्पन्न गटांसाठी १,२२४ सदनिकांचा विकास करण्यात येईल. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात खारघर, सेक्टर-३६ येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटांसाठी २९२२ सदनिकांचा व मध्यम व उच्च उत्पन्न गटांकरिता १२२४ सदनिकांचा प्रकल्प प्रस्तावित आहे. नवी मुंबईच्या स्थानिक आगरी-कोळी संस्कृतीच्या संवर्धनासाठी व सांस्कृतिक उपक्रमांसाठी नेरुळ येथे आगरी-कोळी संस्कृती भवनाची निर्मिती करण्यात आली. त्याच हेतूने त्याच पद्धतीचे आणखी एक संस्कृती केंद्र उलवे येथे भूमीपुत्र भवनाद्वारे साकारले जाणार आहे. नवी मुंबईतील सार्वजनिक आरोग्य सुविधांना अधिक व्यापकता देण्यासाठी नागरी आरोग्य केंद्राची निर्मिती सिडको करीत आहे. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व्यावसायिक प्रदर्शनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वाशी येथे 'स्टेट ऑफ द आर्ट' दर्जाचे प्रदर्शन संकुल पूर्णत्वाकडे जात आहे. खारघर येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे मनोरंजन महाउद्यान-सेंट्रल पार्कच्या पहिल्या टप्प्याचा विकास याच वर्षात पूर्ण होत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पांसारखे भव्यतम प्रकल्प भविष्यात नवी मुंबईच्या अंतर्गत परिवहनावर भार टाकू शकतात. त्याच अनुषंगाने भविष्यातील परिवहनविषयक सुविधांची क्षमतावृद्धी करून अंतर्गत परिवहनाच्या सुविधांना परिपूर्णत्व देण्यासाठी खारघर येथील दीर्घ पल्ल्याचा अत्याधुनिक पादचारी पुल (स्काय वॉक) देखील २०१२ मध्ये पूर्णत्वास जाईल. ग्रामविकास भवन हा ग्रामीण व नागरी समन्वयाचा प्रकल्प पंचायत राज प्रतिनिधींना सुविधा प्रदान करील. हा प्रकल्प येत्या वर्षात साकारणार आहे.





एकूणच अतिशय महत्वपूर्ण ठरलेल्या २०११ सालात सर्वसामान्यांना ॲम्नेस्टी योजनांसारख्या योजनांनी जसा दिलासा दिला त्याचप्रमाणे काही पायाभूत व भौतिक सोयी-सुविधांतील महत्त्वपूर्ण प्रकल्पसुद्धा जनतेला अर्पण करण्यात आले. त्यामुळे येते वर्षदेखील एकूण प्रस्तावित विकासकार्याचा आढावा घेता या वर्षापेक्षाही अधिक वेगवान व अधिक लोकोपयोगी उपक्रमांना साकारणारे असेल.



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

भारतरत्न **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांच्या **५५व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०११ रोजी** सिडको भवन कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करण्यात आले. **मा. श्री. प्रमोद हिंदुराव,** अध्यक्ष, सिडको यांनी महापुरूषांच्या जयंती आणि पुण्यतिथीनिमित्त त्यांचे स्मरण करून अभिवादन करण्याचा नवीन उपक्रम सुरू केला आहे. महापुरूषांच्या विचारांचे मंथन व्हावे व त्यांच्या कार्याचे स्मरण रहावे यासाठी हा उपक्रम अखंडपणे राबविण्याची त्यांची आग्रही भूमिका आहे.




नवी मुंबईतील कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस **डॉ. दिलीप वाटाणे,** जनसंपर्क अधिकारी, **श्री. व्ही. सी. कांबळे, श्री. दीपक ठाकरे, श्री. बाविस्कर, श्री. पी. डी. इंदुरकर, श्री. बी. के. पाटील** यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यांच्या विविध भागांतून दादर येथील चैत्यभूमीला भेट देण्यासाठी येणाऱ्या भीमबांधवांना अल्पोपहार देण्याचाही संकल्प पूर्ण करून, जवळजवळ ५०,००० बांधवांच्या अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.





नवीन औरंगाबाद कार्यालयातही प्रशासक **श्री. सुधाकर बापुराव तेलंग** यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिडको भवन येथील नूतनीकृत समिती कक्षाचे उद्घाटन





**दि. ३ जानेवारी, २०१२ रोजी** सिडको भवन येथील दुसऱ्या मजल्यावरील नूतनीकृत समिती कक्षाचे उद्घाटन सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. प्रमोद हिंदुराव** यांच्या शुभहस्ते व उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. तानाजी सत्रे** यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

याप्रसंगी बोलताना मा. श्री. प्रमोद हिंदुराव म्हणाले की, 'समिती कक्षाची रचना व आराखडा उत्तम झाला आहे'. या कक्षात सिडकोच्या कार्यप्रणालीसारख्या उद्यमशिल चर्चा व बैठका व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. व्यवस्थापकीय संचालक श्री. तानाजी सत्रे यांनी समिती कक्षाच्या निर्मितीसाठी परिश्रम घेतलेल्या चमूचे कौतुक केले आणि सिडकोच्या लौकिकाला साजेसा समिती कक्ष साकार झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी या समिती कक्षाच्या नूतनीकरणाकरिता परिश्रम घेणाऱ्या श्री. व्ही. सी. कांबळे, कार्यकारी अभियंता, श्री. सोमवंशी, सहाय्यक कार्यकारी अभियंता, श्री. नितीन देशपांडे, अधिक्षक अभियंता (दूरसंचार), श्री. टी. एल. परब, सहाय्यक कार्यकारी अभियंता विद्युत, तसेच स्थापत्य, रचना, ध्वनीक्षेपण यंत्रणा आणि अनुषंगिक व्यवस्थेकरिता कार्यरत कंत्राटदारांच्या प्रतिनिधींचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता व महाव्यवस्थापक (तांत्रिक) श्री. के. के. वरखडेकर, मुख्य नियोजक श्री. एम. डी.लेले, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ.बावस्कर, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी श्री.कमलाकर फंड, मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे श्री. अनिल पाटील यांबरोबर विभाग प्रमुखांसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सिडको व्यवसाय प्रशिक्षण संस्थेची कार्यकारिणी सभा संपन्न

सिडको व्यवसाय प्रशिक्षण संस्थेची कार्यकारिणी सभा संपन्न झाली. याप्रसंगी सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. प्रमोद हिंदुराव** यांच्या हस्ते कॅटरिंग या विषयावरील नव्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या सभेला **श्री. जे. आर. कुलकर्णी,** महाव्यवस्थापक–एसईझेड, **श्री. एस. बी. देशमुख,** व्यवस्थापक पूनर्वसन, **श्रीमती रिमा दिक्षीत,** सामाजीक सेवा अधिकारी, **श्री. प्रदिप रथ,** कंपनी सचीव, **श्री. ए. एन. सुर्वे,** प्रकल्प समन्वयक व **श्री. प्रमोद पाटील,** सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांची उपस्थिती लाभली.



# सिडको व्यवसाय प्रशिक्षण संस्थेच्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण

सिडको व्यवसायिक प्रशिक्षण संस्था खांदेश्वर येथे **दि. २०–१२–२०११** रोजी विविध अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा संपन्न झाला. कॉम्प्युटर हार्डवेअर ॲण्ड नेटवर्किंग, सुविद्या, कार्यालयीन व्यवस्थापनच्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या समारंभाला **श्रीमती रीमा दिक्षित,** मुख्य सामाजिक सेवा अधिकारी तसेच **श्री. प्रदिप रथ,** कंपनी सचिव/प्रकल्प संचालक यांची उपस्थिती लाभली. निमंत्रितांनी प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांना भविष्यातील बदलते युग व आधुनिकीकरण त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या उज्ज्वल भविष्याची वाटचाल नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तंत्रज्ञान या विषयांवर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी **श्री. प्रमोद पाटील** यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# सिडकोच्या दिनदर्शिका-दैनंदिनीचे प्रकाशन





'नवीन वर्षाची सुरूवात ही प्रत्येक संस्था-संघटनेच्या कर्मचाऱ्यांसाठी उत्कंठेची असते, कारण त्याच्या संस्थेची ओळख, प्रतिष्ठा आणि नव्या वर्षात संस्थेच्या ध्येयाला दर्शवणारी दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित होत असते. संस्थेशी त्याच्या जुळलेल्या भावबंधाचे प्रतिक असते. पुढील वर्षभरातील संस्थेच्या नियोजित उद्दिष्टांतील आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी वर्षभर प्रेरणा देण्याचे कार्य या माध्यमातून पार पाडत असते...' अशा शब्दांत श्री. प्रमोद हिंदुराव अध्यक्ष, सिडको यांनी दिनदर्शिका व दैनंदिनी प्रकाशनाच्या उपक्रमाचा गौरव करून सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. **श्री. तानाजी सत्रे** यांनी 'दैनंदिनी व दिनदर्शिका तयार करण्याचे काम अत्यंत अचूक व काळजीपूर्वक हाताळावे लागते, त्यास अनुसरून सिडकोची २०१२ या वर्षाची दैनंदिनी व दिनदर्शिका अत्यंत आकर्षक व माहितीपूर्ण झाली आहे.' अशा शब्दात निर्मितीसाठी परिश्रम घेणाऱ्या चमूचे कौतुक केले.

सिडको महामंडळाच्या नगरनियोजन व पायाभूत सेवासुविधांचा विकास प्रवास सादर करून भविष्यातील सिडकोच्या उद्दिष्टांना अधोरेखित करणाऱ्या माहितीपूर्ण दैनंदिनी व सचित्र दिनदर्शिका सादर करण्याची उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. तानाजी सत्रे यांची संकल्पना साकारण्याचे हे दुसरे वर्ष. अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यावर **मा. श्री. प्रमोद हिंदुराव** यांनीही या उपक्रमाची प्रशंसा करून, दिनदर्शिका व दैनंदिनी अधिक चांगल्या स्वरूपात तयार करण्यात यावी या सूचना दिल्या. जनसंपर्क अधिकारी **डॉ. मोहन निनावे** यांच्या संकल्पनेतून आराखडा तयार झाला व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली दैनंदिनी व दिनदर्शिकेला अंतिम रूप लाभले. मांडणी आणि शब्दांकन यांनी परिपूर्ण ठरलेल्या या दैनंदिनी व दिनदर्शिकेसाठी सिडकोला आर्टवर्क डिझाइन्सची सेवा पुरविणाऱ्या मे. बेटर कम्युनिकेशनस्‌च्या चमूने तर मे. इंटीग्रिटी प्रिन्ट मीडिया या मुद्रणसंस्थेने परिश्रम घेतले. **श्री. अनंतसिंग राजपुत** यांनी दैनंदिनीसाठी माहिती संकलनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. बेटर कम्युनिकेशनस्‌चे श्री. रामकृष्ण सुकेरकर यांच्या नेतृत्वाखाली श्री. कुलदिप अंभोरे, आर्ट डायरेक्टर, श्री. अजित अभंग, मराठी शब्दांकन, श्री. अनु नायर, इंग्रजी शब्दांकन, श्री. नमस्कार कांबळे व श्री. अतुल पाटोळे, आर्टवर्क तसेच श्री. रविंद्र मिरजोळकर, निर्मिती सहाय्य यांचा निर्मितीप्रक्रियेत सहभाग होता. या दिनदर्शिका व दैनंदिनीच्या छपाईची जबाबदारी मे. इंटीग्रिटी प्रिन्ट मीडियाचे श्री. वैभव कोठारी यांनी सांभाळली.

दिनदर्शिकेचे प्रत्येक पान संवादपूर्ण असावे यासाठी **डॉ. दिलीप वाटाणे,** जनसंपर्क अधिकारी यांनी लक्ष घातले आणि एक उत्तम कलाकृती पूर्णतेचा आनंद देणारी या चमूने सादर केली.

## अभिनंदन



ख्यातकीर्त भजनसम्राट **श्री. महादेवबुवा शहाबाजकर** यांना सह्याद्री वाहिनीवरील लोकमानस या कार्यक्रमात **'लोककला आणि समाज प्रबोधन'** या विषयावरील चर्चासत्रासाठी पाचारित करण्यात आले. **दि. १६ डिसेंबर २०१२** रोजी सायंकाळी ५.०० वाजता या कार्यक्रमाचे प्रसारण करण्यात आले. त्यांनी लोककलांनी केलेल्या सामाजिक परिवर्तनासंदर्भात आपले विचार प्रस्तुत केले. सिडको परिवाराच्या वतीने त्यांचे अभिनंदन व पुढील प्रवासासाठी शुभेच्छा!

## अभिनंदन



तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया आणि स्कुल गेम फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर आयोजित नॅशनल तायक्वांदो चॅम्पियनशीप २०११ स्पर्धेत **चि. हिमांशू विसाळे** याने सुवर्ण पदक पटकावले. मध्यप्रदेशातील दातिया येथील जिल्हा क्रिडा संकुलात पार पडलेल्या या स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात चि. हिमांशुने सफाईदार विजय मिळविले. सिडकोचे कार्यताकी अभियंता श्री एस. एस. विसाळे यांच्या या सुपुत्राने मिळवलेल्या यशाबद्दल सिडको परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीला शुभेच्छा !

# Delegates from GUDA & GIFT visited CIDCO and Navi Mumbai.

Delegates from Gandhinagar Urban Development Authority (GUDA) and Gujarat International Finance Tec-City Company Ltd., (GIFT) visited CIDCO on **28th December 2011**; the delegates are visiting Navi Mumbai and CIDCO to gain new insight into planned development of the city with a prime focus on infrastructure development.

The delegates were welcomed at CIDCO Bhavan following which they were informed about various activities undertaken by CIDCO through a Corporate Film and later by a Presentation. **Mr. Soma Vijayakumar's** presentation about CIDCO's premier projects, where special emphasis was given to NMIA, SEZ and Navi Mumbai Metro was illuminating. The interactive session was fruitful as the delegates gained new insights into planning and development under taken by CIDCO and was done in the presence of CIDCO's MD, **Shri Tanaji Satre,** IAS and respective technical heads of various Departments. The interactive session was followed by a Site visit to Kharghar, where the delegates visited Central Park, International Golf Course, Kharghar Railway Station and the various Housing Projects undertaken by CIDCO at Kharghar.

CIDCO's efforts in creating a model, self-sustained City which is rich in natural beauty yet very much modern and forward looking was praised by the visiting delegates; who cited that the Navi Mumbai is an example of planned development where infrastructure precedes the housing and commercial development.





The team of delegates comprised; **Shri Ashok Bhavsar**, Chairman, GUDA; **Smt. Mamata Verma** – Chief Executive Authority, GUDA; **Shri N.K. Patel**, Addl. Secretary, R&B Dept., Govt. of Gujarat; **Shri M.R. Shah,** STP, GUDA; **Shri K.N Ravat**, Dy-Ex. Eng., GUDA; **Shri D.N. Brahmbhatt**, Admin Officer, GUDA. Along with officials from GIFT, **Shri R.K. Jha,** MR/ Director-in-Charge; **Shri Ulhas Dharmadikari,** Chief Technical Officer; **Shri Prakash Gaur**, VP (PA&E); **Shri Dipesh Shah**, VP (Business Development); **Ms. Pragya Srivastava**, Asst. Manager (Land).

# औरंगाबाद झालर क्षेत्रातील जनतेला दिलासा
# सेवाशुल्क प्रति चौ.मी. रु. २१३०/- वरून रु. ५५०/- श्री. प्रमोद हिंदुराव

औरंगाबाद झालर क्षेत्राच्या विकासासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाली आहे. त्यामुळे येथे आवश्यक त्या शहर पातळीवरील सेवा-सुविधा पुरविण्याची जबाबदारी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची आहे. सेवा-सुविधा पुरविण्यासाठी अंदाजित खर्च रुपये २१३०/- प्रति चौ.मी. एवढा येत आहे. परंतु स्थानिक जनतेचा या सेवाशुल्क आकारणीस असणारा विरोध लक्षात घेऊन, ही बाब सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत मांडण्यात आली. बैठकीत त्यावर विस्तृत विचार होऊन एकूण शुल्क औरंगाबाद महानगरपालिकेच्या शुल्काएवढेच आकारण्याचे ठरले. सेवा-सुविधा शुल्काचा दर कमी करण्यात आल्यामुळे झालर क्षेत्रातील भौतिक सेवासुविधांकरीता लागणारा निधी हा राज्य व केंद्र शासनाच्या विविध विकास योजनांच्या माध्यमातून उभारण्यात येईल. त्याचप्रमाणे पूर्वी आकारण्यात आलेले विकास शुल्क रु. ७०/- प्रति चौ.मी. हे तसेच ठेवून औरंगाबाद महानगरपालिका आकारित असलेले रु. ५५०/- प्रति चौ.मी. या शुल्कातून वजा जाता उर्वरित रक्कम म्हणजेच रु. ४८०/- प्रति चौ.मी. इतकेच सेवासुविधा शुल्क आकारण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यामुळे रु. २१३०/- प्रति चौ.मी. एवढा आकारण्यात येत असलेले शुल्क कमी करून रु. ४८०/- प्रती चौ.मी. इतकेच आकारण्यात येणार असल्याने रु. १६५०/- प्रति चौ.मी. एवढ्या रकमेने विकास शुल्क परिणामकारकरित्या कमी झाले आहे. त्यामुळे आता प्रति चौ.मी. रु.४८०/- सेवासुविधा दर रु. ७०/- विकास शुल्क झालर क्षेत्रातील २८ गावांतील जनतेला आकारण्यात येणार आहे. अशा रितीने झालर क्षेत्रातील जनतेला अधिकाधिक लाभ देण्याचा प्रयत्न सिडकोने केला आहे.

## पदोन्नती

सिडको महामंडळात पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांना डिसेंबर २०११ मध्ये पदोन्नती देण्यात आली आहे.

**पदोन्नती**

◆ अधिक्षक अभियंता (स्थापत्य): **श्री. अे. बी. पवार** ◆ वरिष्ठ परिवहन अभियंता: **श्री. अे. बी. शेंडे** ◆ परिवहन अभियंता: **सौ. हेमलता व्ही. वटूकुरू** ◆ विकास अधिकारी (सामान्य): **श्री. एस. बी. ढोले** ◆ सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य): **श्री. डी. जी. बोराडे** ◆ सहाय्यक विकास अधिकारी (सामान्य): **श्री. व्ही. एम. पायगुडे, श्री. डी. डी. गणोरे** व **श्री. आर. बी. टकले** ◆ सहाय्यक कार्यकारी अभियंता (विद्युत): **श्री. वाय. एम. एस. मापरा** ◆ निवडश्रेणी आरेखक: **श्री. एस. अे. मंडळ** ◆ लेखापाल: **श्री. बी. एम. पवार.**

पदोन्नतीप्राप्त झालेले सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !

## अभिनंदन

सिडको कर्मचारी संघटनेचे सचिव **श्री.जे.टी. पाटील** यांची सिडको कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीस पदाकरीता निवड करण्यात आली आहे. **दि १५ डिसेंबर २०११ रोजी** त्यांनी सरचिटणीस पदाचा (प्रभारी) पदभार स्वीकारला. **हार्दिक अभिनंदन.**

## अभिनंदन

सिडको बी.सी. कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस **श्री. नरेंद्र हिरे** यांची सिडको बी.सी. कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी (प्रभारी) निवड करण्यात आली. **दि. १५ डिसेंबर २०११ रोजी** त्यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. **हार्दिक अभिनंदन.**

## निवृत्ती



**श्री. बिपीनचंद्र एच. गांधी**



**श्री. मोतिराम जी. जाधव**



**सौ. सुनंदा बी. पाटील**



**सौ. राधिका डब्ल्यू. राव**



**श्री. अरविंद के. साळवे**



**श्री. चंदू डी. पाटील**



**श्री. श्रीराम जे. पालांडे**

**श्री. बिपीनचंद्र एच. गांधी** (अधिक्षक अभियंता), **श्री. मोतिराम जी. जाधव** (विकास अधिकारी), **सौ. सुनंदा बी. पाटील** (सहाय्यक विकास अधिकारी), **सौ. राधिका डब्ल्यू. राव** (सहाय्यक विकास अधिकारी), **श्री. अरविंद के. साळवे** (निवडश्रेणी आरेखक), **श्री. चंदू डी. पाटील** (निवडश्रेणी वाहनचालक) व **श्री. श्रीराम जे. पालांडे** (सुरक्षा रक्षक) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ डिसेंबर, २०११ रोजी** निवृत्त झाले.

प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या निरोप समारंभाप्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, सिडको बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, सिडको ओबीसी कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन, सिडको इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मुख्य संपादक, मुद्रक प्रकाशक : **जनसंपर्क अधिकारी,** सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी). या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.